## मनोगत

'पुंडलिका भेटी । परब्रह्म आले गा ।।' या संतवचनानुसार पांडुरंग भक्तराज पुंडलिकाच्या भेटीसाठी पंढरीला आला आणि त्याच्या विनंतीवरून तेव्हापासून तो भक्तांच्या कल्याणासाठी पंढरपूर येथेच भक्तांची वाट पहात उभा आहे. पांडुरंग हा पंढरीला जाणारा 'प्रथम वारकरी' आहे. वारकऱ्यांसाठी आदर्शवत असलेला पांडुरंग अठ्ठावीस युगांपासून केवळ भक्तांच्या कल्याणार्थ दोन्ही हात कमरेवर ठेवून (समत्वभावाने) विटेवर द्वैतात उभा आहे. भावाच्या भुकेल्या पांडुरंगाला भक्ताच्या भेटीची अतीव ओढ असून त्याच्या भेटीने तो प्रसन्न होतो आणि त्याला कल्याणरूपी कृपाशीर्वाद देतो.

भक्तांच्या (साधकांच्या) कल्याणासाठी तळमळणारा हा पांडुरंग कलियुगात सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या रूपात आज आपल्याला लाभलेला आहे, हे आपले अहोभाग्य आहे.

पांडुरंग 'भक्त (शिष्य) कसा असावा ?' याचा आदर्श आहे; म्हणूनच या पुस्तकाला 'पंढरीचा वारकरी' असे नाव दिले आहे. यात 'वारकरी म्हणजे स्वतः पांडुरंग आहे', हे अध्याहृत आहे.

सहस्रो वर्षे विविध युगांमध्ये विविध प्रकारे साधना करूनही मनुष्याला भगवत्प्राप्ती होत नाही; परंतु या घोर कलियुगात स्वतः भगवंत (पांडुरंग) भक्तांसाठी तिष्ठत उभा असून भक्तांना आनंदाचे आस्वादन घेण्यासाठी बोलवत आहे, हे कलियुगातील साधकांसाठी वरदानच म्हणावे लागेल.

या ग्रंथात सांकेतिक रेखाकृती असलेल्या वारकऱ्याच्या चित्राद्वारे त्याची माहिती दिली आहे. मी 'श्री गणेश - अध्यात्म दर्शन' या ग्रंथात 'वर्णवपु श्री गणेश' (संत ज्ञानेश्वरांनी श्रीगणेशाला ज्ञानेश्वरीत संबोधल्याप्रमाणे) या प्रकरणात 'अंक, बीजमंत्र, स्वर आणि व्यंजने कशी अनुस्यूत आहेत', हे रेखाकृती काढून दर्शवले आहे आणि त्याद्वारे श्रीगणेशाचे आध्यात्मिक दृष्ट्या महत्त्व विशद केले आहे. त्या रेखाकृतीवरूनच मला वारकऱ्याच्या सांकेतिक रेखाकृतीची कल्पना सुचली.

भाविक वारकरी पंढरीला पांडुरंगाच्या दर्शनाला जातांना ‘९’ (नऊ) या अंकाप्रमाणे (जीव-भावाप्रमाणे) जात असतो; परंतु वारीतील (साधनेतील) सातत्य आणि आनंदावस्था यांमुळे त्याच्यात पालट होऊन तो ‘१’ (एक) या अंकाप्रमाणे आत्मस्वरूप होतो. त्याला आत्मानंदाचा प्रसाद मिळतो आणि शेवटी तो ब्रह्मस्वरूपात विलीन होतो. हे या ग्रंथात सांकेतिक रेखाकृतीने सुस्पष्ट केले आहे.

प्रस्तुत ग्रंथात पंढरी (पंढरपूर), पांडुरंग, भक्तशिरोमणी पुंडलिकाचे महात्म्य, वारी आणि वारकरी यांचे आध्यात्मिक स्वरूपाचे वर्णन सविस्तरपणे केलेले आहे. या ग्रंथाच्या वाचनामुळे पंढरपूरला जाणारे वारकरी आणि इतर भाविक यांचा पांडुरंगाप्रती भक्तीभाव अन् त्याच्या भेटीची ओढ वाढणार आहे. त्यांना पंढरपूर, भक्तराज पुंडलिकाचे अपार भक्ती महात्म्य, वारीचे आध्यात्मिक महत्त्व यांचे आकलन होऊन त्यांची श्रद्धा वृद्धींगत होण्यास साहाय्य होणार आहे.

‘सर्व भाविकांनी पांडुरंगाप्रती आपली श्रद्धा वाढवून साधना करावी, अनुभूतीद्वारे भक्तीचा आस्वाद घेऊन आनंद घ्यावा आणि यातून आपली आध्यात्मिक उन्नती करून घ्यावी’, हा प्रस्तुत ग्रंथलिखाणाचा उद्देश आहे. ‘विठ्ठल विठ्ठल गजरी । अवघी दुमदुमली पंढरी ।।’ या संत चोखामेळ्यांच्या भजनपंक्तीनुसार त्यांनी नामजपात रंगून भान हरपून पंढरीच्या भक्तीसागरात मनसोक्त डुंबावे. अंतर्बाह्य शुचिर्भूत व्हावे.

या ग्रंथाच्या वाचनाने ‘प्रत्येकाला पंढरीच्या वाटेवर वाटचाल करणाऱ्या दिंडीतील ‘एक तरी पाऊल अनुभवावे’, अशी ओढ लागून भक्तीची ही गंगा अशीच अखंड वहात रहावी व प्रत्येक जिवाची जलद आध्यात्मिक उन्नती व्हावी, हीच सदिच्छा !’ अशा या आनंदकंददात्या पांडुरंगाची महती वर्णन करण्याची ही अनमोल संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. यासाठी मी त्या आनंददात्या पांडुरंगाच्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता व्यक्त करतो.’

**- (परात्पर गुरु) परशराम पांडे (महाराज)**

# अनुक्रमणिका


१. पंढरपूरचे स्थानमाहात्म्य २६

२. पांडुरंगाचा प्रिय भक्त पुंडलिक ! २८

३. पांडुरंग माहात्म्य ! ३३

४. ‘पांडुरंगाष्टकम्’ – श्रीमद् आद्य शंकराचार्यविरचित विठ्ठलस्तवन ३७

५. संतांनी केलेले पांडुरंगाचे वर्णन ५१

६. पांडुरंगभक्ती ५३

७. पांडुरंग हाच पंढरीचा ‘पहिला वारकरी’ ! ५५

८. एकादशीचे माहात्म्य ६१

९. वारीचा आरंभ, स्वरूप आणि वैशिष्ट्ये ६३

१०. पांडुरंगाच्या ओढीने वारीत आनंदाने वाटचाल करणारे वारकरी ! ६९

११. सांकेतिक रेखाकृती असलेल्या वारकऱ्याचे चित्र आणि त्याचे विश्लेषण ७३

१२. स्वतःच्या लीलेतून भक्तांना ब्रह्मानंदाची अनुभूती देणारा भगवंत ! ७९

१३. भक्तांचा भगवंताविषयीचा अपार श्रद्धाभाव ८०

१४. सांप्रतकालीन समाजाची विदारक परिस्थिती ८०

१५. परिस्थितीत पालट होण्यासाठी संत ज्ञानेश्वरांनी केलेल्या प्रार्थनेप्रमाणे पांडुरंग पंढरीत उभा असणे ८२

१६. परात्पर गुरु डॉ. आठवले हे त्या पांडुरंगाचेच सगुण रूप असणे ! ८२

१७. निर्गुण आणि सगुण पांडुरंगांच्या चरणी कृतज्ञता ! ८३

卐 परिशिष्ट १ : भक्तांनो, पांडुरंगाची अधिकाधिक कृपा होण्यासाठी व्यष्टी साधनेसह समष्टी साधनाही करा ! ८४

卐 परिशिष्ट २ : प्रस्तुत ग्रंथाच्या संदर्भातील सेवा करतांना साधकांना शिकायला मिळालेली सूत्रे आणि आलेल्या अनुभूती ८८